पुण्य नगरी
नगरी
बुधवार, २४ सप्टेंबर २०२५ ■ कोल्हापूर



# 'विवेकानंद'मध्ये एड्स जनजागृती

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबईतर्फे विवेकानंद महाविद्यालयात इंटेसिफाईड आयईसी कॅम्पेन अंतर्गत एचआयव्ही एड्स जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. यावेळी पंचगंगा रुग्णालयाच्या आयसीटी समुपदेशिका सुरेखा जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एचआयव्ही संसर्गाची कारणे स्पष्ट केली. एड्स प्रतिबंधासाठी जनजागृती मोहिमेत महाविद्यालयीन युवक-युवतींचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक प्रा. एच. जी. पाटील यांनी केले. आभार प्रा. एस. पी. पंचभाई यांनी मानले. नियोजन आरआरसी नोडल ऑफिसर मेजर सुनीता भोसले यांनी, तर सूत्रसंचालन अंडर ऑफिसर सायली वडकर हिने केले. ज्युनिअर सायन्स विभागप्रमुख प्रा. एम. आर. नवले, प्रा. एस. एल. पाटील, प्रा. एल. एस. नाकाडी, प्रा. पद्मजा पाटील, प्रा. शलाका मुठाणे आदी उपस्थित होते. प्रबंधक सचिन धनवडे आणि कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

तरुण भारत संवाद
बुधवार, २४ सप्टेंबर २०२५

# विवेकानंदमध्ये करिअरच्या संधीसंदर्भात व्याख्यान

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र व बायोटक्नोलॉजी विभागाच्या वतीने 'करिअर अपॉर्च्युनिटीज इन मायक्रोबायोलॉजी" या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. सातारा येथील एलबी कॉलेजमधील सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील यांनी नोकरीच्या संधीबद्दल मार्गदर्शन केले. शिक्षण, संशोधन, फार्मास्युटिकल, इंडस्टीयल क्षेत्रात उपलब्ध असलेल्या संधी यासंदर्भात मार्गदर्शन केले. प्रा. व्ही. व्ही. मिसाळ यांनी प्रास्ताविक केले. आभार डॉ. के. के. भिसे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. टी. सी. गौपाले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.